# अहवाल

प्रा.डॉ.मिसाळ एन.व्ही
पुस्तक परिक्षण
दि.३०/०४/२०१९

प्रति,

मा.प्राचार्य

**कला, वाणिज्य व विज्ञान महाविदयालय, सोनई**

**विषय : पुस्तक परीक्षणाचा अहवाल स्विकारण्याबाबत**

महोदय,

वरील विषयान्वये मी आपणाकडे अहवाल सादर करतो की, मुळा एज्युकेशन सोसायटीने ' अंबरीश मिश्र ' लिखित ' गंगेमध्ये गगन वितळले ' या पुस्तकाचे परिक्षण महाविदयालयाच्या प्राध्यापकांनी केले आहे. एकुण प्राध्यापकांपैकी ७१ प्राध्यापकांनी परिक्षण केले त्या पुस्तक परिक्षणाचा अहवाल संस्था ऑफीसमध्ये देण्यात आला आहे. विदयार्थ्यांना गांधी विचार सत्य अहिंसा इत्यादी तत्वासंबंधी प्राध्यापकांनी सर्व वर्गात योग्य मार्गदर्शन केले आहे.

तरी पुस्तक परिक्षणाचा अहवाल स्विकारावा ही विनंती.

कळावे.

आपला विश्वासु

(डॉ.मिसाळ एन.व्ही)

**Report**

Dr. Misal N.V.,
Book Review
30/04/2019

**To,**
**The Principal,**
Arts, Commerce and Science College, Sonai,

**Subject: To accept Report on Book Review**

Respected sir,

With reference to above cited subject, I am submitting here with the report on Book Review of ***Gange Madhe Gagan Vitale*** by Ambrish Mishia Total 71 teachers reviewed the book. The reviews have been submitted to Mula Education Society, Sonai office.

The teachers guided the students regarding Gandhji's thoughts on Truth and Non Violence.

I request you to accept the report

Yours faithfully

Dr. Misal N.V.

*Mula Education Society's*

# Arts, Commerce & Science College Sonai,

**Meeting**

Day & Date: Friday, 15/02/2019. Time: 11.45am Venue: Seminar Hall

**Attendance**

| Sr. No | Name of the Teacher | Subject | Sign |
|---|---|---|---|
| 1 | Prin. Dr. Laware S.L. | Botany | |
| 2 | Vice Prin. Dr. Tuwar A. R. | Botany | |
| 3 | Dr. Chopade B. B. | Commerce | |
| 4 | Dr. Zine D. E. | Economics | |
| 5 | Dr. Verpe M G. | English | |
| 6 | Dr. Darandale S. R. | Commerce | |
| 7 | Dr. Roundal S. R. | Commerce | |
| 8 | Dr. Darandale S. A. | Librarian | |
| 9 | Dr. Khedkar S. P. | English | |
| 10 | Prof. Phatake V. R. | Chemistry | |
| 11 | Dr. Sadekar H. K. | Physics | |
| 12 | Dr. Shaikh M. J. | Zoology | |
| 13 | Prof. Shinde B. L. | Chemistry | |
| 14 | Prof. Khedkar B. G. | Mathematics | |
| 15 | Dr. Darandale V. E. | Botany | |
| 16 | Prof. Kardile H. J. | Physics | |
| 17 | Dr. Dandawate R. R. | Zoology | |
| 18 | Dr. Darade S. S. | History | |
| 19 | Dr. Salve A. V. | Politics | |
| 20 | Prof. Jadhav S. S. | Politics | |
| 21 | Dr. Wagh R. V. | Geography | |
| 22 | Dr. Sonawane J.C. | History | |
| 23 | Prof. Najan S. A. | Chemistry | |
| 24 | Prof. Fakir S. Z. | Geography | |
| 25 | Dr. Choudhare S. B. | Hindi | |
| 26 | Prof. Jadhav T. B. | Marathi | |
| 27 | Dr. Misal N. V. | Marathi | |
| 28 | Prof. Jangle M. S. | Chemistry | |
| 29 | Prof. Auti S. K. | Geography | |
| 30 | Dr. Khandare R. B. | Dir. of Phy. Edu. | |
| 31 | Prof. Salve Y.B. | Chemistry | |

Mula Education Society's

# Arts, Commerce & Science College, Sonai

## Meeting


Day & Date: Friday, 15/02/2019. Time: 11.45am Venue: Seminar Hall

### Attendance

| Sr. No. | Name of the Teacher | Subject | Sign |
|---|---|---|---|
| 1. | Smt.Kakade Jayashri R | Chemistry | |
| 2. | Smt. Lande Meena B. | Chemistry | |
| 3. | Shri. Musmade Jagdish. B. | Chemistry | |
| 4. | Smt. Kadam Manish Bhausaheb | Chemistry | |
| 5. | Smt. Darandale Priyali B. | Chemistry | |
| 6. | Miss. Lohakare Harshali M. | Chemistry | |
| 7. | Smt. Todmal Vandana B. | Chemistry | |
| 8. | Shri. Khilari Kishor A. | Chemistry | |
| 9. | Ms. Sonal More | Chemistry | |
| 10. | Shri. Pawar Vishal. M. | Org. Chemistry | |
| 11. | Smt. Agale Ashwini A. | Org. Chemistry | |
| 12. | Miss. Sonawane Nilima Shyamrao | Ana. Chemistry | |
| 13. | Miss. Kadu Anuradha Narayan | Ana. Chemistry | |
| 14. | Shri. Tuwar Dnyaneshwar A. | Botany | |
| 15. | Shri. Devmalkar Vijay Sarjerao | Botany | |
| 16. | Miss. Kulkarni Komal U. | Botany | |
| 17. | Shri. Arangale Kiran Bhausaheb | Botany | |
| 18. | Smt. Nagpure Shubhangi Babasaheb | Botany | |
| 19. | Ms. Dushing Swati | Physics | |
| 20. | Shri. Virkar Avinash | Physics | |
| 21. | Shri. Padar Dnyaneshwar Baasaheb | History | |
| 22. | Miss. Matkar Kavita B. | History | |
| 23. | Shri. Admane Santosh L. | B.B.A. | |
| 24. | Shri. Tambe Yogesh B. | B.B.A. | |
| 25. | Shri. Darade Ambadas A. | B.B.A. | |
| 26. | Miss. Kusalkar Sonali A. | B.B.A.(C.A.) | |
| 27. | Miss. Tuwar Rutuja Ashok | B.B.A.(C.A.) | |
| 28. | Shri. Sayyad Liyakat | B.B.A.(C.A.) | |
| 29. | Shri. Nangare Yogesh Laxman | B.B.A.(C.A.) | |
| 30. | Shri. Nipunge Rahul G. | Geography | |
| 31. | Shri. Darandale Amol S. | Geography | |
| 32. | Shri. Jadhav Rameshwar Dasharath | Geography | |
| 33. | Shri. Mengal Suresh P. | Zoology | |
| 34. | Miss. Bapte Pradnya Sunil | Zoology | |
| 35. | Shri.Pathan Rameej | Commerce | |
| 36. | Shri. Shaikh Azhar H. | Commerce | |
| 37. | Shri. Dahatonde Amol Machhindra | Hindi | |
| 38. | Shri. Nishane G.V. | English | |

39 Pawar P.P.
40 Kale R
Dushing S.E. B Voc physics

# गंगेमध्ये गगन वितळले



अंबरीश मिश्र

गांधी

काळाच्या चरख्यावर माणुसकीची वस्त्रं विणणारा
विसाव्या शतकातला कबीर.

मुक्तीचं आकाश धरतीत पेरणारा अलौकिक महापुरुष.

स्वातंत्र्यलक्ष्मीच्या या कफल्लक उपासकाची जीवनकहाणी
म्हणजे उत्कट महाकाव्य. उज्ज्वल अन् उदासही...

गांधींनी एका धाग्यात देश जोडला! मनं सांधली!
फाळणीचं दुर्दैव मात्र ते टाळू शकले नाहीत...

ते स्वातंत्र्यसंग्रामाचे सरसेनापती.
तरीही एकटेच भिरभिरत राहिले कैकदा.

धर्म ही त्यांच्या मते एक उन्नत प्रेरणा.
पण त्यांच्या समोर मात्र धर्माच्या नावावरच
रक्त सांडलं-सांडत राहिलं.

विलक्षण प्रेम आणि आत्यंतिक द्वेष अशा कचाट्यात असतो गांधी.

पुन्हा एकदा पाह्यला हवं महात्म्याकडं.

महादेवभाई देसाई, जमनालाल बजाज, मनुबेन गांधी,
हरिलाल गांधी... या आणि अशाच काही जिवलग सहकाऱ्यांच्या
आठवणी, दैनंदिनी आणि पत्रव्यवहारातून एक वेगळाच
नयानवेला गांधी रेखांकित होतो...

जणू गंगेत वितळत जाणारं आकाश

Gangemadhye Gagan Vitalale ₹ 200
9788174342607 E6
Rajhans Prakashan Pvt. Ltd.
J-01-2003

राजहंस प्रकाशन / पुणे

'समालोचना'

"गंगेमध्ये गगन वितळले"

— अंबरीश मिश्र

अंबरीश मिश्र यांची 'गंगेमध्ये गगन वितळले' ही म. गांधींच्या जीवनावर प्रकाश टाकणारी रचना वाचली. फक्त 161 पानांमध्ये गांधीजींचे व त्यांच्या कार्याचे पारदर्शी वास्तव, लेखकीय निष्पक्षतेने मांडण्याचा लेखकांचा प्रयत्न निश्चितच कौतुक करण्यासारखा वाटला.

गांधी पर्वातल्या प्रत्येक भावाला अचूकपणे हेरत लेखकांनी गांधी जीवनाचे पारायण ह्या सात खंडात मांडले, त्या खंडाचे शीर्षक बेमालूमपणे अर्थाला स्पर्श करतात व गांधींच्या कार्याची समर्पकता कळून येते.

द. आफ्रिकेपासून सुरू झालेली गांधींची सत्य-अहिंसेची प्रयोगशाळा एकीकडे सर्वसामान्य माणसात आत्मभानाचे बळ जागवत होती, त्याचवेळी प्रयोगकर्ता म्हणून गांधींच्या स्वत्वाची ही परीक्षा घेत होती. मरित्झबर्ग स्टेशनचा अपमान पचवणारा गांधी हा भविष्यातील 'महात्म्याचा' आरंभ बिंदू होता.

जनमानसाला घडवताना गांधी स्वतःही प्रामाणिकपणे घडत होते, आपल्या जीवनातील वाईट बाबींची, अपराधाची प्रांजळ कबुली देत होते. द. आफ्रिकेतील उत्तरार्धानंतर जो गांधी उरला, तो वैयक्तिक गांधी नव्हताच. मात्र इथूनच गांधींच्या व्यक्तिमत्वाचे खरे पैलू समोर येतात, जे दृष्टिक्रमाप्रमाणे सकारात्मक-नकारात्मक असू शकतात. द. आफ्रिकेतील गिरमिटिया भारतीयांचा ट्रान्सवाल सरकार विरोधी लढ्यातील गुरींच्या अध्यायापूर्वी तेथील लोकांच्या गरजा, त्यांची मानसिकता, व आंदोलनामागील इच्छाशक्ती स्वार्थ आणि या लोकांच्या तुलनेने भारतीय नागरिकांच्या गरजा वेगळ्या होत्या. जनस्वभाव, जनस्वार्थ माहीत असताना ही गांधी प्रयोगांसाठीच म्हणून का, पण स्वतःच्या मताप्रमाणे जनतेला चालवत होते. येथे गांधींच्या 'मताप्रमाणेच' शब्द अभिप्रेत आहे, मर्जीप्रमाणे नाही. आणि म्हणूनच द. आफ्रिकेपासून स्त्रियांच्या आंदोलनात प्रत्यक्ष सहभागाची शृंखला भारतीय आंदोलनांत ही गांधींच्या पुढाकारामुळेच दिसून येते. या वेळी ही त्यांची रणनीती वाखाणण्याजोगी होती.

गांधी, जे स्वकार्यापेक्षा राष्ट्रनिर्मिती, व्यक्तिनिर्मिती साठी झटले, पण त्यांच्या व्यक्तिमत्वातील विरोधाभास मात्र बऱ्याच ठिकाणी खटकतो.

ट्रान्सवालच्या वंशभेदविरोधी चळवळीत तुरुंगात गेलेल्या आंदोलकांच्या मुलांची जबाबदारी गांधी फिनिक्स वसाहतीतील अनेक घरांवर सोपवतात, कुठलेही पूर्व आर्थिक नियोजन न करता ?!! स्वतः बॅरिस्टर असलेले गांधी, याच बॅरिस्टरी कामासाठी द. आफ्रिकेत आलेले गांधी औपचारिक शिक्षण ही नाकारतात. त्यात कहर म्हणजे कोणताही पूर्व अनुभव नसताना कस्तुरबाचे चौथे बाळंतपण गांधी स्वतःच करतात, तेही फक्त पुस्तक वाचून!! गांधी आणि त्यांच्या बाजूची माणसे ही माणूसमात्र नसून त्यांच्या नाना प्रयोगासाठीचे चाचणे-लोबणे सामान होती का काय, हा प्रश्न पडल्याशिवाय राहत नाही.

फिनिक्स मधील गांधींवर युरोपियन कुळाचाराचा प्रभाव होता. पण जवळपास याच काळात आपल्या मुलाला लिहिलेल्या पत्रात ते युरोपियन ची जीवनशैली ठीक नसल्याचे विधान करतात.

महादेवभाई, जमनालाल बजाज वर पितृवत प्रेम करणारे गांधी स्वतःच्या मुलांना त्या प्रेमाचा अधिकारी ही मानत नाही. सार्वजनिक कामांसाठीचे आठ आणे व्हिक्टोरिया ला खर्च करणाऱ्या गांधी महादेवभाई वर गांधी - सार्वजनिक पैशाचा अपव्यय केला म्हणून खडसावतात, पण मानवी शरीराच्या मर्यादा का विसरतात? 'मीच तुमचा गिरसप्पा' सांगत महादेवभाईंना गिरसप्पाचा जलप्रपात पाहावयास नकार देणारे गांधी, स्वतःचे व्यक्तिमहत्त्व का लादू इच्छितात? फ्रेंच भाषा शिकू इच्छिणाऱ्या महादेवभाई ला वेळ वाया जातो म्हणून खडसावतात?

गांधी त्यांच्या जवळच्या लोकांना वारंवार स्वतःच्या हक्कांची कल्पना देतात. महादेवभाई, हेन्री पोलॅक, जमनालाल इ. वर गांधींची मोहिनी इतकी चालते की त्यांच्या जीवनाच्या छोट्या-मोठ्या भागांवर ही गांधींचे नियंत्रण प्रस्थापित होते, की ते गांधी पासून लांब जाण्याचा विचारच करू शकत नव्हते. पण गांधीपासून लांब जाण्याचा विचार करणाऱ्या लेकासमोर हेच गांधी लाचार का भासतात? आपल्या कृतीतून स्वावलंबनाचे धडे देणारे गांधी जमनालाल बजाज वा इतरांकडे आर्थिक मदत मागण्यासाठी याचनेऐवजी हक्काचा अट्टहास करताना दिसतात.

स्वतःच्या मर्जीप्रमाणे इतरांना घडवण्याचा, इतरांच्या आयुष्याचा शिल्पकार बनण्याचे श्रेय घेण्यासाठीचा हा अट्टहास होता का? गांधींना देश घडवायचा होता, देशातील नागरिक घडवायचे होते, याच

ते स्वतःला मेंढपाळाच्या भूमिकेत ठेवतात. पण हे करताना समोर असलेले जीव मेंढरं नसून माणसे आहेत, याचे गांधींना विस्मरण होते; आणि म्हणूनच स्वतःबरोबर परिवारांवर वैराग्य लादण्याचा अधिकार त्यांना नसावा. हरिलाल च्या बाबतीत गांधींचे वर्तन हुकूमशाहप्रमाणे शासने. व्यक्ती च्या स्वतंत्र व्यक्तिमत्वास त्यांचा विरोधच होता. स्वतःच्या तर्कबुद्धीने इतरांचे व्यक्तित्व खुंटे करायचे. येन केन प्रकारे प्रत्येकाला आपल्या शरण आणायचेच हे गांधी व्यक्तित्वाचे खूप तंत्र होते.

हरिलाल च्या बाबतीत जे घडले, त्यात गांधींचे कारणच मोठे दिसते; सामाजिक बहिष्कार हा व्यक्तींना आतून तोडून त्याला विद्रोहाला, असंगतीला बाध्य करतो. हरिलाल च्या बाबतीतले गांधींचे वर्तन, त्यांच्या व्यक्तिगत आकसास दाखवतात. हरिलाल मधून तयार होणार प्रति गांधी, महात्मा गांधींनी अगदी व्यवस्थित नष्ट केला.

मनुबेन च्या प्रकरणातही गांधींचा अवैज्ञानिक दृष्टिकोन समोर येतो. 1941 च्या व्यक्तिगत संग्रहात ही आपले स्थान अढळ ~~स~~ ठेवण्यासाठी चे गांधींचे आंदोलक बाण त्यांची ~~खिन्नी दर्शवतात~~ असुरक्षितता दर्शवतात, जिथे ते ठणकावून सांगतात की मी सेनापती आहे आणि बाकीचे सैन्य.

गांधींनी अहिंसेच्या रूपाने निश्चित ह्या जगाला भेट देणगी दिली. त्या वाटेवर चालणाऱ्या कार्यकर्त्यांची ही फळी ते उभारू शकले. पण ~~द~~ स्वातंत्र्यानंतर देशाला सांभाळणारा नेता व नेतृत्व तयार करताना कार्यकर्त्यांचे जसे हृदयपरिवर्तन अपेक्षित होते, ते झाले नाही. या आधी उल्लेख केल्याप्रमाणे येथील जनतेचा स्वभाव, अपेक्षा आणि गरजा वेगळ्या होत्या. गांधींनी तयार केलेल्या पृष्ठभूमीचा इतरांकडून आयतावापर झाला. त्या विरोधात त्यांना बोलता आले नाही, त्यांनी त्यांचे वर्चस्व स्वीकारले, गांधींनी त्यांना वात्सल्य दिले. पण हे वात्सल्य अशा मातेचे होते, जिला तिचा मुलगा मोठा होऊच नये असं वाटत.

या देशाला घडवताना गांधी अडले. त्यांनी प्रयोग- मानतेचे प्रयोग केले. परंपरागत मूल्य संस्कारांना छेडताना ते सरले. या देशासाठी, येथील जनतेसाठी त्यांनी स्वतःचे अस्तित्व

देशाच्या अस्तित्वात विलीन केले. गांधीजींचे सामाजिक जीवन जितके स्पृहणीय होते, तितकेच त्यांचे व्यक्तिगत जीवन त्यांच्या स्वभावाच्या नकारात्मक भूमिकांही समोर आणते. सामाजिक नियमांप्रमाणे 'महात्मा'च्या जीवनातील नकारात्मक भाग हा समाज सुधारकांना उदाहरण म्हणून दिला जातो. पण गांधी एका वेळी या दोन्ही भूमिकांमध्ये आयुष्यभर जगत होते, असे वाटते.

प्रा. श्वेता बा. चौधारे,
हिंदी विभागप्रमुख,
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
सोनई - 414105
मो. 9823268987

# गंगेमध्ये गगन वितळले (सारांश)

गंगेमध्ये गगन वितळले या पुस्तकातून महात्मा गांधी व त्यांचे कार्य, व्यक्तिगत जीवन यांच्या संदर्भातील इतर साधने, पत्रे यांच्यातून बरीच मौलिक माहिती मिळाली जी आतापर्यंत उपेक्षित होती. गांधीजींच्या शिक्षणापासून विवाह, नंतर द. आफ्रिकेत केलेले काम यांचा एक मार्गदर्शकच आपल्या समोर येतो. त्यामुळे या पुस्तका विषयीचे काही महत्वाचे मुद्दे कायम चिरकाल स्मरणात राहण्यासारखे आहेत.

महात्मा गांधी यांनी आपल्या बॅरिस्टर कामांची सुरुवात द. आफ्रिकेतून केली. आफ्रिकेत भारतीय गुलाम मजुरांचे असामान्य संघटन गांधींनी करून दाखवले. त्यांना आफ्रिकेत भारतीय कुली बॅरिस्टर म्हणून ओळखले जाई. यातून भारतीय लोकांना आपल्या छोट्या न्यायालयीन कामासाठी गांधींचा फार मोठा उपयोग झाला. त्यातूनच ट्रान्सवालच्या लढा उभा करण्यात व सर्व काळे लोक एकत्र करण्यास यश आले. या लढ्यास (ट्रान्सवालचा) नाव महात्मा गांधी पुतण्या मगनलाल गांधी यांनी नाव सुचवले 'सदाग्रह', तो शब्द महात्मा गांधींनी तासून-सोलून व संस्कारित करून त्यास नाव दिले 'सत्याग्रह' जो पुढे गांधीजींचे एक अमोघ अस्त्र म्हणून उदयास आले. जो मोहनदास मुंबईच्या कोर्टात चार वाक्य इंग्रजीत बोलणारा म्हणून परिचित होता त्याने द. आफ्रिकेच्या शेतमजुरांच्या, फेरीवाल्यांच्या. व खाणमजुरांच्या यांच्या जगण्याला अर्थ देतो यापेक्षा श्रेष्ठ कार्य काय असू शकते. यांचा परिणाम म्हणजेच ऊसमजूर, खाणमजूर वगैरे आपला परिचय 'गिरमिटिया' म्हणून करून देत, कारण त्यांना ब्रिटिश सरकार बरोबर ठरावाचा 'अग्रीमेंट' करावा लागे या अॅग्रीमेंट शब्दाचे शुद्ध हिंदीकरण म्हणजे 'गिरमिट' असा होय आणि गिरमिटच्या बेड्या ज्यांच्या पायात पडल्या ते गिरमिटिया होय. त्यामुळे मोहनदासही गिरमिटियाच होय कारण द. आफ्रिकेतील भारतीयांसोबत तोही नियतीशी याच करारात बांधला गेला.

गांधीजी व हरिलाल एकाच नदीचे दोन टोक जे कधीही एक होवू शकले नाही त्यांच कधीच जमले नाही परंतु हरिलाल जे काही चुकीचं करायचा तो सर्व गांधीजींना कळवत असे त्यामुळे लोकांचा विरोध का असेना परंतु हरिलाल आपल्या पापाची संपूर्ण ग्वाही गांधीजींना देत असे. आपल्या कार्यामध्ये अनेक कार्यकर्ते व माणसं जोडण्याची गांधीजींची एक वेगळी कला त्यांना अवगत होती. या सर्व कार्यातून उसंत मिळाल्या. पिता व आपल्या मुलांना त्यांचे आयुष्य जगताना नेहमी दुय्यमी भूमिका घेतली त्या कारणाने मुलांचे आयुष्य धूळीस मिळाले

महात्मा गांधीजी आपल्या कार्याचा उत्तराधिकारी म्हणून नेहरूंची निवड करून चूक केली कारण लोकशाहित कोणी ही परिवार आपला उत्तराधिकारी निवडू शकत नाही परंतु काळाची गरज म्हणून राष्ट्रीय काँग्रेसने गांधीजीतील गुण समजूनच त्यांचे नेतृत्व मान्य केले कारण देशाला स्वातंत्र्य केवळ गांधीमुळेच मिळणार होते हे काँग्रेसी नेत्यांना पूर्णपणे समजले होते त्यामुळे लोकांना यांची हकालपट्टी करूनच गांधींच नेतृत्व मान्य करण्यास काँग्रेस तयार झाली.

प्रा. दहातोंडे अमोल मच्छिंद्र
हिंदी विभाग
Ph - 9975184040
Gmail - amolmdahatonde@Gmail.com

प्रा. डॉ. ज्ञानदेव एकनाथ डेंगळे
कला वाणिज्य व विज्ञान महा. सोनई
२४/४/२०१९
विभाग - अर्थशास्त्र

परिक्षण / अभिप्राय

गंगेमधले गगन वितळले

लेखक अंबरीश मिश्र

मी गंगेमधले गगन वितळले हे पुस्तक वाचले. यामध्ये काही निरीक्षणे मी माझ्या वाचनातून नोंदविले आहेत.

- भारताच्या भूमीमध्ये महात्मा गांधी हे व्यक्तिमत्त्व जन्मले हे भारताचे भाग्य म्हणावे लागेल.
- कमालीचा कठोर आणि वत्सलसहनशील माणसांना एकाच धाग्यात ओवणारा जगाला जिंकणारा क्रांतिशील गांधी भारतभूमीला लाभला
- स्वातंत्र्योत्तर भारतीयांची मन दुभंगलेली आहेत ही माझी फार मोठी चिंता आहे हे वाक्य मला अतिशय आवडले. ही वस्तुस्थिती गांधीजींनी मांडली ती आजही ताजी आहे असे वाटते.
- सुरत ओरबाडण्याची वृत्ती सामाजिक - आर्थिक विषमतेला जन्म देते हिंसा हे विषमतेचे अपत्य असते. हे विचार महत्त्वाचे वाटले.
- गांधीजींचे राजकारणापेक्षा रचनात्मक सुधारणेचे काम चिरकाल टिकणारे आहे
- भारताला धर्मनिरपेक्षता या दोन शस्त्रांची गरज आहेत ... ही शक्ती नसेल तर देशातील ऐक्य असा सगळं निकाम आहे हा ठेवा आपण परत एकदा तपासून घेतला पाहिजे.
- दक्षिण आफ्रिकेत भारतीयांना गांधीजी कोणी काय म्हणून पिळून पिळून ब्रिटिशांविरुद्ध गांधीजी आजच्या समाजातील तरुणांना प्रेरणादायी वाटले पाहिजे असे वाटते.
- महादेव देसाई व महात्मा गांधी यांचे ~~नाते~~ विलक्षण नाते अनेक गोष्टी दर्शवून जातात.

एकंदरीत पुस्तक वाचनीय असून आजच्या तरुण युवकांपर्यंत हे विचार पोहोचविणे ही एक मोठी जबाबदारी आहे असे वाटते.

प्रा. डॉ. डेंगळे डी. ई.

## गंगेमध्ये गगन वितळले: - पुस्तक परीक्षण

डॉ. संदीप प्रभाकर खेडकर
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सोनई

'गंगेमध्ये गगन वितळले' या पुस्तकाचे स्थूलमानाने सात भागामधे विभागणी झाली आहे. प्रथम भाग **'मी तयांशी झुंजताना भोगले ऐश्वर्य मोठे....'** व **'उंच जांभळा डोंगर शोभे सुनील क्षितिजावर'** या दोन भागामध्ये महात्मा गांधीचा दक्षिण आफ्रिके मधील लढा स्पष्टपणे चित्रबद्ध करण्यात आला आहे. सुरुवात अर्थातच मरीत्ज्बर्ग स्टेशन वरील अपमानाचा जळजळीत प्रसंग. थोरल्या भावाच्या सांगण्यावरून गांधींनी अब्दुल्ला शेठ अ‍ॅड कंपनीचा प्रस्ताव स्वीकारला आणि नाताळ बंदरावर ते पोहचले.

प्रिटोरिया शहरातून काळ्या लोकांना असणारी पदपथावरून चालण्याची बंदी, भारतीय लोकांना मतदानापासून वंचित करण्याचा कायदा, ट्रांसवालचा लढा, इत्यादि अनेक गोष्टी विणल्या जातानाच महात्मा गांधी मध्ये होणारा बदल लेखक अंबरीश मिश्र यांनी बारकाईने टिपल्याचा दिसतो. गोपाळ कृष्ण गोखले यांचा दक्षिण आफ्रिकेचा दौरा, व महात्मा गांधींनी वसवलेली फिनिक्स व टॉलस्टॉयवाडी व त्यांची तेथील धडपड, वंशवादाविरुद्ध लढा हा समर्थपणे साकारला आहे. चार्ल्स, कोर्डिस, आयझाक व विशेषत: कॅलंबाख यांची यक्तिरूपे डोळ्यांसमोर हुबेहूब उभी राहतात.

**'प्राणसखा'** हा भाग महादेव देसाई यांना समर्पित आहे. १९१५ मध्ये गांधी दक्षिण आफ्रिकेहून भारतात कायम वास्तव्यासाठी आले. गांधी मधील मानसओळखण्याची कुवत व त्यास योग्य जबाबदारी देण्याची भूमिका ही काही औरच. नडीयादचा प्रसंग शिष्य महादेव देसाई व गुरु गांधीजी या दोघांवरती अनेक कवडसे टाकून जातो.

महात्मा गांधींना जुलाब सुरूझाल्यानंतर सोयीसाठी महादेवभाई कमोड मागवतात व गांधीजी आपला त्यावर राग व्यक्त करतात. चंगळवादापासून कसे दूर राहावे. समाजकार्य करीत असताना ब्रह्मचर्य व्रत मनुष्याची कशी परीक्षा घेते या वरील गांधीचे विचार महादेवभाई यांना प्रेरक ठरले. गांधीजीवरची त्यांची नितांत भक्ती मधून त्यांना कण कण ऊर्जा मिळाली.

**'है बहरे बगे दुनिया चंद रोज'** मध्ये जमनालाल बजाज यांची गांधीजी वरची नितांत श्रद्धा व्यापली आहे. या पाठाचे विशेषपन म्हणजे पत्रव्यावहारातून एकमेकांचे व्यकतीमत्व विकसित होत जाते. सत्याग्रही होण्याचे मार्ग व ते हसील करण्यासाठी मार्गक्रमण कसे करावे या बद्दल गांधीजींचे विचार मौलिक ठरतात. जसे महादेव देसाई तसे जमनालाल बजाज गेल्यावरती झालेली आगतिकता लेखक मिश्र यांनी योग्य रीतीने कटिबद्ध केली आहे.

**'मै दुख की लंबी रात...'** या पाठात गांधीजीचा मोठा मुलगा हरीलाल हा आपल्या बापाविरुद्ध का वागला असवा याची कारणमीमांसा आढळते. एकतर गांधीजींना राजकीय धावपळीत मुलाकडे बालपणात वेळ देता आला नाही. नंतर त्याची परदेशी शिक्षण घेवून वडिलांसारखा वकील होण्याची इच्छा पूर्ण होऊ शकली नाही. त्याचा भक्त प्रल्हाद जाहला. बापाविरुद्ध बंड केले. हरीलालच्या आयुष्याने चुकीची दिश्या घेतल्या. व्यवसायात यश न मिळाल्याने अनिति वापरुन, कर्ज बुडवून , अफरातफरीतून पैसे कमविण्याचे ठरविले. तिथेही अपयशी. वडिलांनी संबंध तोडले. मुलेपण दुरावली. पत्नी गुलाबबेनच्या मृत्यू नंतर आयुष्य दिशाहिन जाहले. राग दाखवायचा म्हणून मुस्लिम व पुन्हा हिंदू धर्म स्वीकारला. आयुष्याची शोकांतिका जाहली. मृत्यू जाहल्यावर दोन दिवस शव तसेच पडून राहिले.

**'तू जहां चलेगा मेरा साया साथ होगा'** हा भाग स्वातंत्र्यतील उत्तरार्धातील संघर्षाचे वर्णन करतो. पाकिस्तान निर्मितीवर हिंदू-मुस्लिम नेत्यांशी चर्चा, व्हॉईसरॉय लॉर्ड माऊंटबेटण, बॅ. जिना यांच्याशी वार्तालाप, फाळणीचा प्रस्ताव १५३ विरुद्ध २९ मतांनी सम्मत होतो, इत्यादि घटनांनी परिपूर्ण होतो.

**'गंगेमध्ये गगन वितळले'**, हा शेवटचा भाग. स्वातंत्रोतर कालामध्ये गांधीजी हे समारंभापुरतेच उरले. पंडित नेहरूनी ओळखले की गांधी स्वतंत्र भारताला परवडणार नाही. गांधी तत्वज्ञान बाजूला पडले. १९१५ मध्ये गांधीजी भारतात परतल्यानंतर त्यांचा जसा इंग्रजा बरोबर तसाच भारतीयन बरोबर विशेषतः कॉंग्रेस बरोबर संघर्ष जाहला. चंपरण्याचा सत्याग्रह, खेडाचा शेतसारा आंदोलन आणि अहमदाबादमधील गिरणीकामगारांचा संप कॉंग्रेसविना यशस्वी करून राष्ट्रीय नेता म्हणून प्रतिमा निर्माण केली व कॉंग्रेस मध्ये आपले अस्तित्व सिद्ध केले. संघटना व नेता हा किती महत्वाचा संबंध आहे. त्यागावर आधारलेली संघटना पुढे कशी स्वार्थ व सत्ताकांशा मुळे लयास जाते याच वर्णन या भागात आहे. शेवटी, असाच कोणी नेता पुन्हा येईल या आशेवर शब्दनाट्य निशब्द होते.

हे पुस्तक म्हणजे अनेक लोकांनी महात्मा गांधीजी बद्दल दिलेले आपले बहूमूल्य शब्दचित्र आहे तसेच गांधीजींनी देखील अनेकांबद्दल दिलेले कवडसारूपी चित्र आहे त्यामुळे अनेक दृष्टीकोणातून गांधीजी आपल्या समोर साकारतात. ठिकठिकाणी पत्राचे भाग समाविष्ट केल्यामुळे गांधीजींचे शब्दचित्र अधिकच जीवंत वाटते. आत्तापर्यंत न दिसलेले गांधीजी भेटतात व जनसामन्यात जनसामान्य म्हणून वावरतात.